Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# नांदेड शहरातील विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर शाळेच्या वातावरणाचा परिणाम: एक अभ्यास

**डॉ. एस.वाय.पाटील**

शिक्षण शास्त्र संकुल

स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेड

**Abstract:**

*प्रस्तुत संशोधन नांदेड शहरातील शाळेच्या वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या परिणामाशी संबधित आहे. यासाठी संशोधकाने ५० टक्के शाळेतील ३०० विद्यार्थ्यांकडुन डॉ. के.एस. मिश्रा यांच्या मॅन्युअल फॉर स्कुल ईन्व्हाईरमेंट इन्व्हेंन्टरी सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातुन संकलीत केली आहे. त्या नुसार उच्च, मध्यम व निम्न गटानुसार मध्यमान, प्रमाण विचलनातुन टी मुल्यांच्या आधारे शालेय वातावरणातील घटकांचे निष्कर्ष काढण्यात आले.*

*प्रस्तुत संशोधनात शालेय वातावरणाच्या तीन घटकांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये सर्जनशील उत्तेजन, बोधात्मक प्रेरणा/प्रोत्साहन, नकार, नियंत्रण हे घटक उच्च गटासाठी प्रभावी असल्याचे निष्कर्ष समोर आले.*

**Key Words:**अध्ययन, शालेय वातावरण

**Introduction:**

शिक्षण ही बालकाच्या जन्मापासुन ते मरेपर्यंत चालणारी एक अखंड प्रक्रिया असते. ती केवळ शाळा महाविद्यालयापर्यंत मर्यादित अथवा विशिष्ट स्थिती पर्यंत सिमीत नसते. शाळेप्रमाणेच माणुस घरीदारी, समाज, जीवनात सर्वत्र शिकत असतो. या वरुन असे म्हणता येईल कि, ती ज्ञानात्मक पातळीवर चालणाऱ्या क्रिया मुळीच नसते. शारिरीक आणि भावनात्मक पातळीवर व्यक्तिचा जो विकास होत असतो त्याचाही समावेश शिक्षणातच होत असतो. म्हणुन जीवन जगत असताना व्यक्तिला अनेकविध अनुभव येत असतात. याचाच अर्थ असा कि, शाळेशिवाय घर, शेजार-पाजार, समाजातील लोक आणि सामाजिक संस्था या मधुनही शिक्षण मिळण्याची प्रक्रिया सुरु असते शिक्षण प्रक्रियेत दोन घटकांचा समावेश करण्यात येतो. अनौपचारिक किंवा स्वयंशिक्षणात चेतक आणि व्यक्ति असला प्रसंग, घटना व व्यक्ति औपचारीक किंवा स्वयंशिक्षणात चेतक आणि व्यक्ति असला प्रसंग, घटना व व्यक्ति औपचारिक किंवा संख्यामधुन जे शिक्षण दिले जाते त्यातीतल आणखी एक घटक म्हणजे शिक्षक होय.

साहोनीच्या मते, "शिक्षक हा प्रसंग, घटना-चेतक यांचे नियंत्रण करतो. म्हणुन त्याच्याच ठिकाणी या सर्व घटकांचे एकत्रिकरण होते. म्हणुन शेवटी शिक्षक व बालक यामध्ये जी प्रक्रिया होते (अध्ययन व अध्यापन) तिला शिक्षण प्रक्रिया असे म्हणतात. याचे फलित कालांतराने बालकाच्या ठिकाणी दिसल्यास विकास झाला म्हणजे शिक्षण प्रक्रिया पुर्ण झाली असे म्हणवयास हरकत नाही."

संशोधकाने या संदर्भात विचार करत असतांना विद्यार्थ्यांला जसे आई-वडिलांकडुन संस्कार मिळत असतात तसेच शाळेतही घडत असतात व विद्यार्थी समोर आयुष्यात यशस्वी होतात. पण शाळेचे वातावरण जर दुषित असेल तर विद्यार्थ्यांवर म्हणावे तसे संस्कार घडत किंवा घडत नाहीत. एवढेच नव्हे तर शिक्षकाच्या अध्यपनावर ही त्या वातावरणाचे संस्कार सातत्याने पडत जातात म्हणुन शाळेचे वातावरण फार महत्वाचे आहे. त्यामुळे संशोधका या परिणामाचा शोध घेण्याची गरज वाटु लागली म्हणुन संशोधकाने या समस्येची जाणीव व वस्तुस्थिती प्रत्यक्ष डोळ्यासमोर ठेवुन ही समस्या संशोधासाठी निवडण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये शाळेचे प्रशासन, शाळेतील भौतिक सुविधा,शाळेतील मानवीय घटक, शाळेतील ग्रंथालय, शाळेतील प्रयोगशाळा, शाळेतील अभ्यासपुरक उपक्रम एकंदरीत शाळेच्या वातावरणाचा विद्यार्थ्यांचा अध्ययनावर होणाऱ्या परिणामाचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

**Review of Related Literature:**

**I.** ओडेह आर.सी. इंटरनॅशनल जरनल ऑफ रिसेंट सायन्टिफिक रिसर्च (ISSN ०९७६-३०३१, जुलै २०१५): माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर शाळेच्या वातावरणाचा प्रभाव: विशेष संदर्भ - नायझेरिया.

१) शालेय समीतीने विद्यार्थ्यांसाठी चांगले वातावरण निर्मीती उपलब्ध करुन अध्ययन अध्यापन पद्धतीसाठी विशिष्ट सोयी प्राप्त करुन द्याव्यात.
२) संबधित शाळेतील वातावरण विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी व शिक्षकांच्या अध्यापनासाठी सुरक्षित व मोकळे असावे.
३) विद्यार्थी हा शाळेचा महत्वाचा भाग आहे असे समजुन कार्य करावे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांनमध्ये प्रभावी शिस्त रुजवुन त्यांना आकार देण्याचा प्रयत्न करावा.

**II.** फ्रॅन्सिस रीड, वाशिंगटन स्कुल रिसर्च सेंटर- टेक्निकल रिपोर्ट ( मे २००८) : शालेय वातावरणाचा तरुण विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनाच्या वृद्धीवर होणारा परिणामाचा अभ्यास

१) प्रस्तुत संशोधन हे विशिष्ट वेळेच्या गुणावर आधारलेले होते. जरी त्यांची वेळ तर्कावर आधारलेली असली तरी हे विद्यार्थ्यांच्या वृत्तीवर चटकन प्रकाश टाकणारी आहे. ही वृत्ती वेळेनुसार स्पष्ट पणे बदलु शकते.
२) शाळेची रचना व व्यवस्था हा इमारतीचा मुख्य भाग असला तरी विद्यार्थ्यांच्या वृत्तीवर त्याचा परिणाम होतो.
३) शाळेतील इतर घटक (ग्रामीण, शैक्षणीक, कर्मचारी) याचाही विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होतो.

**Objective:**

१) विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा अभ्यास करणे.
२) विद्यार्थ्यांच्या अ) बोधात्मक प्रेरणा/प्रोत्साहन, ब) नकार व क) नियंत्रण या घटका नुसार शालेय वातावरणाचा अभ्यास करणे.
३) शालेय वातावरणाच्या उद्दिष्ट क्र. २ मधील विविध घटकांचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर झालेला परिणाम अभ्यासने.
४) अध्ययन प्रक्रिया आणि शालेय वातावरणा संदर्भात उपाय योजना सुचविणे.

**Hypotheses:**

१) अ) बोधात्मक प्रेरणा/प्रोत्साहन, ब) नकार व क) नियंत्रण नियंत्रण या घटकाचा परिणाम होतो.
२) विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर शालेय वातावरणाचा परिकल्पना -१ मधील घटकाचा परिणाम होतो.

**Scope:**

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील नांदेड शहरातील शाळेच्या वातावरणाशी व्याप्त आहेत.

**Limitations:**

प्रस्तुत संशोधन हे नांदेड शहरातील १० शाळेच्या वातावरणातील ३०० विद्यार्थ्यांशी मर्यादित आहे.

**Tools Used:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने डॉ. के.एस. मिश्रा यांच्या मॅन्युअल फॉर स्कुल ईनव्हाईरमेंट ईनव्हेन्टरी चा वापर केला आहे. संकलीत केलेल्या माहितीचे उच्च व मध्यम, उच्च व निम्न, मध्यम व निम्न या गटानुसार मध्यमान आणि प्रमाण विचलनाच्या माध्यमातुन टी मुल्यांच्या आधारे परिकल्पना अभ्यासली आहे.

**Result and Disscussion:**

प्रस्तुत संशोधाच्या कार्यसाठी निवडलेली समस्या ही शाळेच्या वातावरणाशी संबंधित आहे. या साठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. त्याचद्वारे समस्येचे निराकरण करण्यात आले तसेच प्रश्नावली मधील प्रशची रचना शाळेच्या वातावरणासाठी संबधित असलेल्या घटकांनुसार तयार करण्यात आली आहे. त्याच बरोबर शाळेच्या वातावरणाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर कसा होतो या संदर्भात त्याद्वारे संशोधनातील अचुक माहितीचे दर्शन व्हावे व आपला शोध पुर्ण व्हावा दृष्टीकोण समोर ठेवुन विद्यार्थी प्रश्नावली घेण्यात आली आहे. अशा प्रकारे संशोधनाची कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे.

TABLE : 01

| अ.क्र | सरासरी गुण | विद्यार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ७५ % पेक्षा अधिक गुण | ०८ | २.६६ |
| २ | ६५ ते ७४ % | ४१ | १३.६६ |
| ३ | ५५ ते ६४ % | १२६ | ४२.०० |
| ४ | ४५ ते ५४ % | ११६ | ३८.६६ |
| ५ | ३५ ते ४४ % | ०९ | ३.०० |
| | एकुन विद्यार्थी | ३०० | १०० |






TABLE : 02

बोधात्मक प्रेरणा / प्रोत्साहन ( Cognitive Encouragement )

| अ. क्र | गट | एकुन संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | टि मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उच्च व मध्यम गट | | | |
| १ | मध्यम | २०७ | ४३३.०७ | ६०.३१ | २७३ | ०.२८ |
| २ | उच्च | ६६ | ४३५.५७ | ६३.०४ | | |
| | | | उच्च व निम्न गट | | | |
| १ | निम्न | २७ | ४१६.७७ | ५१.७८ | ९३ | १.४८ |
| २ | उच्च | ६६ | ४३५.३७ | ६३.०४ | | |
| | | | मध्यम व निम्न गट | | | |
| १ | मध्यम | ६६ | ४३५.५७ | ६३.०४ | ९३ | १.४८ |
| २ | निम्न | २७ | ४१६.७७ | ५१.७८ | | |




www.aiirjournal.com

TABLE : 03

| नकार ( Rejection ) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च व मध्यम गट | | | | | | |
| अ.क्र | गट | एकुन संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | टि मूल्य |
| १ | मध्यम | ६७ | ४३०.१० | ५४.५४ | २७४ | ०.०२ |
| २ | उच्च | २०७ | ४२९.९२ | ५७.६९ | | |
| उच्च व निम्न गट | | | | | | |
| १ | निम्न | २६ | ४४०.१२ | ११२.१९ | २३३ | ०.४५ |
| २ | उच्च | २०७ | ४२९.९२ | ५७.६९ | | |
| मध्यम व निम्न गट | | | | | | |
| १ | मध्यम | ६७ | ४३०.१० | ५४.५४ | ९३ | ०.४३ |
| २ | निम्न | २६ | ४४०.१२ | ११२.१९ | | |





TABLE : 04

नियंत्रन ( Control )

| अ.क्र | गट | एकुन संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | टि मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च व मध्यम गट | | | | | | |
| १ | मध्यम | १२६ | ४३६.४५ | ५९.६४ | २७८ | १.६० |
| २ | उच्च | १५२ | ४२५.१० | ५७.७३ | | |
| उच्च व निम्न गट | | | | | | |
| १ | निम्न | २२ | ४५६.३१ | ७३.७० | १७४ | १.९० |
| २ | उच्च | १५२ | ४२५.१० | ५७.७३ | | |
| मध्यम व निम्न गट | | | | | | |
| १ | मध्यम | १२६ | ४३६.४५ | ५९.६४ | १४८ | १.१९ |
| २ | निम्न | २२ | ४५६.३१ | ७३.७० | | |



**Result:**

संशोधन मुर्तीसाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच माहिती संकलनासाठी ३०० विद्यार्थ्यांशी शालेय वातावरणाचा विविध घटकावरुन काढलेल्या प्रश्नावलीच्या माध्यमातुन ही मुल्य काढुन अभ्यास केला आहे. यासाठी नांदेड शहरातील १० शाळांची निवड केली आहे.वरिल सर्व माहितीचे विश्लेषण वर्गिकरण अर्थनिर्वचन करुन खालील निष्कर्ष समोर आले आहेत.

**शालेय वातावरणाच्या विविध घटकावरुन काढलेले निष्कर्ष:**

**सर्जनशील उत्तेजन या घटकावरुन काढलेले निष्कर्ष:**

१) सर्जनशील उत्तेजन या घटकाच्या उच्च व मध्यम गटातील उच्च गटाचे मध्यमान मध्यम गटापेक्षा मोठे असल्याचे उच्च गट सर्जनशील उत्तेजनाच्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

२) सर्जनशील उत्तेज या घटकाच्या उच्च व निम्न गटातील उच्च गटाचे मध्यमा निम्न गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट सर्जनशील उत्तेजनाच्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

३) सर्जनशील उत्तेजन या घटकाच्या मध्यम व निम्न गटातील मध्यम गटाचे मध्यमान निम्न गटापेक्षा मोठे असल्यामुळे मध्यम गट सर्जनशील उत्तेजनाच्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

**बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकावरुन काढलेले निष्कर्ष:**

१) बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकासाठी उच्च व मध्यम गटातील उच्च गटाचे मध्यमान मध्यम गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकासाठी प्रभावी असल्यामुळे स्पष्ट होते.

२) बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकासाठी उच्च व निम्न गटातील उच्च गटाचे मध्यमान निम्न गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

३) बोधात्मक प्रेरणा/ प्रोत्साहन या घटकासाठी मध्यम व निम्न गटातील मध्यम गटाचे मध्यमान निम्न गटापेक्षा मोठे असल्यामुळे मध्यम गट बोधात्मक प्रेरणा/प्रोत्साहन या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

**नकार या घटकावरुन काढलेले निष्कर्ष:**

१) नकार या घटकासाठी उच्च व मध्यम गटातील मध्यम गटाचे मध्यमान उच्च गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट परम नकार ह्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

२) नका या घटकासाठी उच्च व निम्न गटातील निम्न गटाचे मध्यमान उच्च गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट परम नकार ह्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्‌अ होते.

३) नकार या घटकासाठी मध्यम व निम्न गटातील निम्न गटाचे मध्यमान मध्यम गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट नकार ह्या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

**नियंत्रण या घटकावरुन काढलेले निष्कर्ष:**

१) नियंत्रण या घटकासाठी उच्च व मध्यम गटातील मध्यम गटाचे मध्यमान उच्च गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट नियंत्रण या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

२) नियंत्रण या घटकासाठी उच्च व निम्न गटातील निम्न गटाचे मध्यमान उच्च गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट नियंत्रा या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

३) नकार या घटकासाठी मध्यम व निम्न गटातील निम्न गटाचे मध्यमान मध्यम गटापेक्षा मोठे असल्यामुळे उच्च गट नियंत्रण या घटकासाठी प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

**उपाय योजना:**

१) अभ्यासक्रम व पाठ्यक्रमा बरोबरच अभ्यापुरक उपक्रम राबवल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासपुरक उपक्रम राबवल्यास विद्यार्थ्यांना अध्यना संदर्भात गोडी निर्माण होईल.

२) अभ्यासक्रमा व्यतिरिक्त वेगवेगळ्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांसोबत चर्चीची जावी.

३) शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर पाठ्यक्रमाच्या वेगवेळ्या क्रियेमध्ये सहभागी व्हावे.

४) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये शिक्षकांना रुची असावी.

५) विद्यार्थ्यांच्या विविध योजनेच्या संदर्भात शिक्षकांना आवड असावी.
६) अभ्यासक्रमातील प्राप्त गुणाबरोबरच शाळेने विद्यार्थ्यांकडुन अपेक्षा ठेवाव्यात.
७) अभ्यासक्रमा बरोबरच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करावा.

**Reference:**

१) डॉ. नागतोडे किरण (१९९७) शालेय व्यवस्थापनातील शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाहः विद्या प्रकाश, नागपुर.
२) डॉ. पाटील गजानन (१९९) पर्यावरण शिक्षण: निराली प्रकाशन, पुणे.
३) डॉ. अनिल कुलकर्णी (२००१) शिक्षणाचे बदलते संदर्भः संकेत प्रकाशन, औरंगाबाद.
४) भारतीय शिक्षण २०१२, २०१३, २०१४
५) Ajao, A. (२००१). Teachers effectiveness on studentsङacademic performance. Journal of Education and Practice ५ (२२).
६) Ajayi, M. A and Ogunyemi, Y. (१९९०). Effect of learningenvironment on studentsङ academic achievement in Lagos State secondary schools. Unpublished MED thesis University of Nigeria.
७) Ajewole, G.A. & Okebukola, F.O. (२०००). Improving sociocultural aspect of classroom learning environment in enhancing students performance in biology.